*१ जानेवारी १९९६ पूर्वीच्या निवृत्तिवेतनधारकांच्या निवृत्तिवेतनात/कुटुंब निवृत्तिवेतनात सुधारणा करण्याबाबत.*

*स्पष्टीकरण .............*

# महाराष्ट्र शासन

## वित्त विभाग

शासन निर्णय, क्रमांक: सेनिवे-१०००/प्र.क्र.३९७/सेवा-४,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक: १९ जुलै २००१.

*पहा:- शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक:सेनिवे १०९९/३०३/सेवा-४, दिनांक १५ नोव्हेंबर १९९९.*

## परिपत्रक

शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक:सेनिवे-१०९९/३०३/सेवा-४, दिनांक १५ नोव्हेंबर १९९९ च्या परिच्छेद क्रमांक:९ मध्ये अशी तरतूद करण्यात आलेली आहे की ज्या प्रकरणी निवृत्तिवेतनधारक/कुटुंब निवृत्तिवेतनधारक १ जानेवारी १९९६ रोजी हयात असेल व त्यानंतर मृत्यु पावला असेल तेथे त्याचे कायदेशीर वारसदार १ जानेवारी १९९६ पासून निवृत्तिवेतनधारक/कुटुंब निवृत्तिवेतनधारकाच्या मृत्यूच्या दिनांकापर्यंतची हयातकालीन थकबाकी मिळण्यास पात्र ठरेल/ठरतील. यासाठी निवृत्तिवेतनधारक/कुटुंब निवृत्तिवेतनधारकांच्या कायदेशीर वारसदारांनी यथास्थिती, निवृत्तिवेतन संवितरण प्राधिकारी म्हणजे, यथास्थिती, अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/कोषागार अधिकारी/विभाग/कार्यालय प्रमुखाकडे अर्ज करावा. सदरहू तरतुदींच्या परिणामी असे निदर्शनास आले आहे की काही कोषागार अधिकारी/विभाग/ कार्यालय प्रमुखांकडून निवृत्तिवेतनविषयक लाभांची हयातकालिन थकबाकी प्रदान करण्यासाठी वारसा हक्क प्रमाणपत्राची मागणी मृत निवृत्तिवेतनधारकाच्या/कुटुंब निवृत्तिवेतनधारकाच्या कुटुंबियांकडे करण्यात येते.

२. या संदर्भात शासन खालीलप्रमाणे खुलासा करीत आहे :-

(अ) ज्या प्रकरणी मृत निवृत्तिवेतनधारकांच्या कुटुंबियांना कुटुंब निवृत्तिवेतन यापूर्वीच मंजूर करण्यात आलेले आहे व जे सध्या कुटुंब निवृत्तिवेतन घेत आहेत अशांच्या प्रकरणी कोषागार अधिकारी/कार्यालय/विभाग प्रमुखांनी वारसा हक्क प्रमाणपत्राचा आग्रह न धरता संबंधित प्रकरणी मृत निवृत्तिवेतनधारकाच्या कुटुंबातील जो पात्र सदस्य मासिक कुटुंब निवृत्तिवेतन घेत असेल त्या व्यक्तीस निवृत्तिवेतनविषयक लाभांच्या हयातकालीन थकबाकीचा अनुज्ञेय हप्ता/हप्ते नेहमीच्या पध्दतीने प्रदान करावे.

(ब) ज्या प्रकरणी निवृत्तिवेतनधारकाने महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ च्या नियम ३५९-अ(१) मधील तरतूदीनुसार वरील नियमावलीच्या नियम ४२-अ मधील नामनिर्देशन पत्राद्वारे एखाद्या विशिष्ट व्यक्तीस नामनिर्देशित केलेले असेल अशा प्रकरणी संबंधित कोषागार अधिकारी/कार्यालय/विभाग प्रमुखांनी वारसा हक्क प्रमाणपत्राचा आग्रह न धरता संबंधित नामनिर्देशित व्यक्तीस निवृत्तिवेतनविषयक लाभांच्या हयातकालीन थकबाकीचा अनुज्ञेय हप्ता/हप्ते प्रदान करावे.

(क) वरील प्रकरणे वगळता, अन्य प्रकरणी मात्र निवृत्तिवेतनधारक/कुटुंब निवृत्तिवेतनधारकांच्या कायदेशीर वारसदारांना निवृत्तिवेतनविषयक लाभांच्या हयातकालीन थकबाकीचा अनुज्ञेय हप्ता/हप्त्यांचे प्रदान करण्यात यावे.

३. या परिपत्रकाची इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

वसन्त वा. चौधरी

शासनाचे उप सचिव.

एच-387(13,000+40-7-01)

प्रति

भारत सरकारचे सचिव, वित्त मंत्रालय, नवी दिल्ली,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई (१२५ प्रती),
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर (१२५ प्रती),
महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई (५ प्रती),
महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर (५ प्रती),
मुख्य लेखा अधिकारी, बी ब्लॉक, दिल्ली प्रशासन, विकास भवन, नवी दिल्ली (५ प्रती),
नियंत्रक, लेखा, परराष्ट्र मंत्रालय, नवी दिल्ली (१० प्रती),
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई (५ प्रती),
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (५२० प्रती),
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, वाशी, नवी मुंबई (१० प्रती),
उप-मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती (प्रत्येकी १० प्रती),
वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक (प्रत्येकी १५ प्रती),
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई (५ प्रती),
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी (प्रत्येकी १० प्रती),
राज्यपालांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे सचिव,
उप मुख्य मंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री व राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव,
*प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
*प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
*प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण कुटीर क्र.३ व ४, अधिदान व लेखा कार्यालय आवार, मंत्रालयासमोर, मुंबई,
मंत्रालयातील सर्व विभाग,
विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,
मंत्रालयाच्या निरनिराळ्या विभागांच्या अधीन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख,
सर्व विभागीय आयुक्त (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रत्येकी २५ प्रती),
सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी (प्रत्येकी २५ प्रती),
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे (१० प्रती),
तंत्र शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई (५ प्रती),
संचालक, महानगरपालिका प्रशासन, मुंबई (५ प्रती),
सर्व विभागीय शिक्षण उप संचालक (प्रत्येकी ३ प्रती),
सर्व विभागीय तंत्र शिक्षण उप संचालक (प्रत्येकी ३ प्रती),
शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई, दक्षिण/उत्तर/पश्चिम,
सर्व प्रशासन अधिकारी, नगरपालिका शिक्षण मंडळ (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व महानगरपालिका व नगरपरिषदा, महाराष्ट्र राज्य (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व जिल्ह्यांचे वरिष्ठ लेखा परीक्षक (शिक्षण) (प्रत्येकी ५ प्रती),
कुल सचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जिल्हा अहमदनगर (१० प्रती),
कुल सचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी (१० प्रती),
कुल सचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला (१० प्रती),
कुल सचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी (१० प्रती),
ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई (१२ प्रती),
शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई (२५ प्रती),
उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग, मंत्रालय, मुंबई (२५ प्रती),
कृषि व पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई (१० प्रती),
संचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई (५०० प्रती)
वित्त विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती, कार्यासन सेवा-४.

---

*पत्राद्वारे.

***Revision of Pension/Family Pension of pre 1-1-1996 Pensioners/ Family Pensioners.***

***Clarification ..........***

# GOVERNMENT OF MAHARASHTRA
## Finance Department

No. PEN-1000/ 397/SER-4,
Mantralaya, Mumbai-400 032. Dated 19 July 2001.

*Read :- Government Resolution, Finance Department, No.PEN-1099/303/SER-4, dated 15 November 1999.*

## CIRCULAR

In accordance with the provisions contained in paragraph 9 of the Government Resolution, Finance Department, No.PEN-1099/303/SER-4, dated 15 November 1999, in cases where the pensioner/family pensioner was alive as on 1 January 1996 and died subsequently, his legal heir is/are also entitled to life- time arrears with effect from 1 January 1996 till the death of pensioner/family pensioner. For this purpose, the legal heir of pensioner/family pensioner has to apply to Pension Disbursing Authorities, i.e., Pay & Accounts Officer, Mumbai/Treasury Officers/Heads of Departments/Offices, as the case may be. It has now been brought to the notice of Government that as a result of these provisions, some of the Treasury Officers/Heads of Departments/Offices insist on submission of succession certificate by the family members of the deceased pensioner/family pensioner for payment of life-time arrears.

2. Government is now pleased to clarify as under:

(a) Where family pension has already been sanctioned to the eligible family member of the deceased pensioner and at present he is in receipt thereof, the Treasury Officers/Heads of Departments/Offices should not insist on the submission of succession certificate by him. In such cases, the instalment/s of life-time arrears of pensionary benefits should be granted to such eligible family member of the deceased pensioner, as per normal procedure.

(b) Where the pensioner has nominated a particular person as per the provisions of Rule 359(a)(i) of the Maharashtra Treasury Rules, 1968 by nomination letter as prescribed in Rule 42(a) of the said rules, the Treasury Officers/Heads of Departments/Offices should not insist on the submission of succession certificate by such nominee. In such cases the instalment/s of life-time arrears of pensionary benefits should be granted to such nominee.

(c) In cases other than those mentioned above, the instalment/s of life-time arrears of pensionary benefits should be granted to the legal heir of the pensioner/family pensioner.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VASANT W. CHAUDHARI,
Deputy Secretary to Government.

एच-387(13,000+40-7-01)2